# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

## ४१२ - ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

☎ २५६५६२३४ फॅक्स २५६५६२३४ **Email : ropune.dte@gmail.com**


ई मेल द्वारे :

जा. क्र. : तंशिविकापु/आस्था-३(ब)/पदनाम निदेशक/२०१९/2687

दिनांक : 29 JUN 2019

प्रति,

या कार्यालयाच्या अधिनस्त
सर्व शासकीय / अनुदानित / स्वायत्त
अभियांत्रिकी महाविद्यालय व तंत्रनिकेतने
व तत्सम संस्था प्रमुख.

**विषय : तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय / अनुदानित / स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालय व तंत्रनिकेतने तसेच तत्सम संस्था आणि तंत्रशास्त्र विद्यालयातील कर्मशाळा व प्रयोगशाळेतील कर्मचा-यांच्या पदनामाबाबत.**
**विधानसभा तारांकित प्रश्न क्रमांक १३७७६६.**

संदर्भ : (१) मा. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कडून ई मेल द्वारे दिनांक २९/०५/२०१९ रोजी प्राप्त झालेली सूचना.
(२) या कार्यालयाचे पत्र क्रमांक तंशिविकापु/आस्था-३(ब)/पदनाम निदेशक/२०१९/२१६२, दिनांक ३० मे, २०१९.
(३) मा. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कडील पत्र क्रमांक १२/आस्था(६)/तारांकित प्रश्न/२०१९/४०७, दिनांक २१ जून, २०१९.

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील संस्थांमध्ये विद्यार्थ्यांच्या विविध अभ्यासक्रमांतील विषयांनुषंगिक प्रात्यक्षिकांसंदर्भात विविध तांत्रिक पदे आहेत. या तांत्रिक पदांच्या पदनामांमध्ये बदल होण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने दिनांक २७/०९/२०१७ च्या शासन निर्णयाद्वारे या तांत्रिक पदांच्या पदनामामध्ये बदल करण्याबाबत विहीत निर्देश उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडून निर्गमित करण्यात आले.

सदर पदनामातील बदलांची नोंद संबंधित पदावरील कार्यरत कर्मचा-यांच्या सेवापुस्तकामध्ये घेण्यात आलेली आहे. मात्र सदर नोंद सेवार्थ प्रणालीमध्येही होणे आवश्यक असल्याने मुख्य कार्यालयाने संदर्भ क्रमांक (३) चे पत्रान्वये मा. संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई यांना सदर पदनाम बदलाची नोंद सेवार्थ प्रणालीमध्ये घेण्यासाठी आवश्यक ती सुविधा उपलब्ध करण्याबाबतची कार्यवाही लेखा व कोषागारे संचालनालयाच्या स्तरावरून करणेबाबत विनंती केली आहे. सोबत सदर पत्राची प्रत जोडली आहे.

तरी आपणास कळविण्यात येते की, सदर पदनामामध्ये बदल होण्याबाबत लेखा व कोषागारे संचालनालयाशी योग्य तो पाठपुरावा संस्था स्तरावर करण्यात यावा व अंतिम अनुपालन अहवाल मुख्य कार्यालयास, तसेच या कार्यालयास सादर करावा.

(डॉ. दि. रा. नंदनवार)
प्र. सहसंचालक,
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

सोबत : वरील प्रमाणे.

प्रत : या कार्यालयातील प्रोग्रॅमर यांना सदरचे पत्र सहपत्रांसह सर्व शासकीय संस्था / कार्यालये यांना ई मेल द्वारे पाठविण्यासाठी रवाना.

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई - ४०० ००१.

दूरध्वनी - ३०२३३४१२, २२६९ ०६०२, २२६४ ११५०/५१, फॅक्स - २२६९ ०००७

E-mail : 12desk@gmail.com Internet : www.dtemaharashtra.gov.in


क्रमांक : १२/आस्था (६)/ तारांकित प्रश्न/२०१९/ ४०८

दि. 21 JUN 2019

**विधानमंडळ प्राथम्य**

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे. 26 JUN 2019 आवक क्र. 6095

प्रति,

मा. संचालक
लेखा व कोषागारे संचालनालय,
५ वा मजला, नवीन प्रशासकीय इमारत
मंत्रालयासमोर, मुंबई - ४०० ०३२.

विषय - सेवार्थ प्रणालीमध्ये पदनामाची सुधारित नोंद करण्याबाबत..
संदर्भ - उच्च व तंत्र शिक्षण विभागाचा दि. २७.०९.२०१७ चा शासननिर्णय.

महोदय,

उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिपत्त्याखालील संस्थांमध्ये विद्यार्थ्यांच्या विविध अभ्यासक्रमांतील विषयांनुषंगिक प्रात्यक्षिकांसंदर्भात विविध तांत्रिक पदे आहेत. या तांत्रिक पदांच्या पदनामांमध्ये बदल होण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने संदर्भात नमुद शासन निर्णयाव्दारे या तांत्रिक पदांच्या पदनामामध्ये बदल करण्याबाबत विहित निर्देश उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडून निर्गमित करण्यात आले.

सदर पदनामातील बदलांची नोंद संबंधित पदावरील कार्यरत कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तकांमध्ये करण्यात आलेली आहे. मात्र सदर नोंद सेवार्थ प्रणालीमध्येही होणे आवश्यक आहे. या पत्राव्दारे आपणांस सदर पदनाम बदलाची नोंद सेवार्थ प्रणालीमध्ये घेण्यासाठी आवश्यक ती सुविधा उपलब्ध करण्याबाबतची कार्यवाही आपल्या स्तरावर करावी अशी विनंती करण्यात येत आहे.

सदर बाबत तारांकित प्रशन क्र. १३७७६६ विचारण्यात आला आहे. सैवार्थ प्रणालीमध्ये योग्य ती पदनाम बदलाची नोंद तीन महिन्यांत घेण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल असे सदर प्रश्नाच्या अनुषंगाने या कार्यालयाने सादर केलेल्या माहितीमध्ये नमुद केले आहे.

या पत्रासोबत खालील कागदपत्रे योग्य त्या संदर्भासाठी जोडण्यात येत आहेत.

१. पदनाम बदलाचा दिनांक २७.०९.२०१७ चा शासन निर्णय.

२. विधानसभा तारांकित प्रश्नाबाबत शासनाचे दि. २१ मे २०१९ चे पत्र

३. या कार्यालयाने सदर बाबत शासनास सादर केलेले पत्र

कृपया सदर सेवार्थ प्रणालीमध्ये शासन निर्णयाप्रमाणे पदनाम बदलण्यासाठी आवश्यक ती सुविधा उपलब्ध करण्याबाबतची कार्यवाही आपल्या स्तरावर करण्यात यावी,ही विनंती.

आपला,

(डॉ. अभय वाघ)
संचालक
तंत्र शिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत -

१. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई -३२ - यांना माहितीस्तव सादर

२. सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालये मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर - यांना कळविण्यात येते की, सदर पदनामामध्ये बदल होण्याबाबत लेखा व कोषागारे संचालनालयाशी योग्य तो पाठपुरावा आपल्या स्तरावरुन करण्यात यावा आणि अंतिम अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा.